**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२४/प्र.क्र.२५२/एसएम-२ दिनांक:-०९ जुलै, २०२५

**मान्यता पत्र**

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
**कलर्स एज्युकेशन सोसायटी, औंध, पुणे**.

**विषय-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी मान्यता पत्र **कलर्स एज्युकेशन सोसायटी, औंध, पुणे संचलित कलर्स इनोव्हेशन ॲकेडमी, सर्वे नं. ८५/६/ब, ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२४/प्र.क्र.२५२/एसएम-२, दिनांक ११/०३/२०२४

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **कलर्स एज्युकेशन सोसायटी, औंध, पुणे या प्राथमिक ते माध्यमिक (इ.१ ली ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून **कलर्स एज्युकेशन सोसायटी, औंध, पुणे संचलित कलर्स इनोव्हेशन ॲकेडमी, सर्वे नं. ८५/६/ब, ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे या प्राथमिक ते माध्यमिक (इ.१ ली ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** ही नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू करण्यासाठी, अटीं व शर्तीसह संदर्भाधिन इरादा पत्र दिले होते. तथापि, मान्यता पत्राचा प्रस्ताव सादर करताना संस्थेने शाळेच्या इमारत बांधकाम बाबत दि.०३.०७.२०२४ रोजीचे अंशतः भोगवटा प्रमाणपत्र सादर केले होते. ही बाब विचारात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पूर्णतः भोगवटा प्रमाणपत्र १ वर्षाच्या आत सादर करणे व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस कोणतीही बाधा येणार नाही यानुषंगाने हमीपत्र सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. त्यास अनुसरून संस्थेने दि.२०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शाळेच्या इमारतीचे पूर्णतः भोगवटा प्रमाणपत्र एका वर्षाच्या आत शिक्षण विभागात सादर करणेची हमी शपथपत्राद्वारे दिली आहे.

सदर बाब विचारात घेता **कलर्स एज्युकेशन सोसायटी, औंध, पुणे संचलित कलर्स इनोव्हेशन ॲकेडमी, सर्वे नं. ८५/६/ब, ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे या प्राथमिक ते माध्यमिक (इ.१ ली ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** करीता आता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून मान्यता पत्र देण्यात येत आहे. तसेच संस्थेने एक वर्षाच्या आत शाळेच्या इमारत बांधकाम बाबत पूर्णत्व भोगवटा प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

३. **अटी व शर्ती:-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) शासन निर्णय दि.१३ मे २०२५ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची शाळेने काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

१४) शाळेच्या इमारत बांधकामबाबत अंशतः भोगवटा प्रमाणपत्र सादर केले असल्याने विद्यार्थी

सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा सुरू असताना इमारतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये.

१५) ज्या ठिकाणी शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे, अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश करू नये, यासाठी आवश्यक ती सुरक्षात्मक तरतूद (बॅरिकेट्स, सूचनाफलक, सुरक्षारक्षकाची नेमणूक इत्यादी) करणे बंधनकारक राहील.

१६) शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर कोणत्याही शर्ती.

PRAMOD VITHOBA KADAM

Digitally signed by PRAMOD VITHOBA KADAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=f82b9e0b005ed06987e1ae26683203c8f241022e0aad6b1c827af561b72f83bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF4901BED6A4BEE0ED963C63F1B0172A4718894A400C0988FBB3381DB913696F, cn=PRAMOD VITHOBA KADAM
Date: 2025.07.09 12:06:47 +05'30'

**(प्रमोद कदम)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.पुणे.
७. निवडनस्ती (एसएम-२)(२५२/२०२४)